पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३२८ दिनांक - ०५/०५/२०२३**

सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर

## जुगार अड्डयावर छापा टाकुन,एकुण १७ इसमांवर कारवाई करून त्यांचेकडुन एकुण ४०,०६०/- रू. किचा मुद्देमाल जप्त.

दि.०४.०५.२०२३ रोजी गोसावी वस्ती,कर्वेनगर,पुणे परीसरात काही इसम बेकायदेशीरपणे १३ पानी रम्मी जुगार पैश्यावर खेळत व खेळवत असलेबाबत प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीदार मार्फतीने खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी गोपनियरित्या पाळत ठेवुन छापा टाकला असता,काही इसम बेकायदेशीरपणे १३ पानी रम्मी जुगार खेळत व खेळवत असल्याचे मिळुन आल्याने **१७ इसमांना ताब्यात घेवुन,त्यांचेकडून जुगारातील रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकुण ४०,०६०/- रू किचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदर प्रकरणी जुगार खेळताना मिळुन आलेल्या १७ इसमाविरूध्द **अलंकार पोलीस स्टेशन येथे गुरनं.६७/२०२३ महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम १२(अ)** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन,त्यांना पुढील कारवाई करीता अलंकार पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.भरत जाधव तसेच सपोनि.अश्विनी पाटील, पोलीस अंमलदार, अजय राणे, इम्रान नदाफ, अमैय रसाळ, संदीप कोळगे, किशोर भुजबळ, ओंकार कुंभार या पथकाने यशस्वी केली आहे.